MHYA140007292019

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.२८/२०१९</u>**

**<u>मध्ये निशाणी क्र. ५ खालील आदेश</u>**

(पारित दिनांक ३०/०६/२०२३२)

प्रस्तुतचा *<u>निशाणी क्र.५</u>* चा अर्ज हा वादींनी प्रतिवादींविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहितेच्या (*यापुढे संक्षिप्तपणे ''दि.प्र.सं.'' असे संबोधले आहे* ) ऑर्डर ३९ रुल १ व २ सहकलम १५१ प्रमाणे दाखल केला आहे. मौजा सातारा, ता.आर्णी येथील जुना शेत स.न.१, नविन भू.क्र.४, क्षेत्रफळ ०१ हे. ८२ आर. ही शेतजमिन आहे.(*यापुढे संक्षिप्तपणे ''<u>दावा मिळकत</u>'' असे संबोधले आहे*). अर्जदार हीचे मालकीची ताब्यात व वहिवाटी असलेली सदर मालमत्तेची प्रतिवादींनी वादीचे शांततामय ताब्यास व वहितीस दाव्याचा निकाल लागेपर्यंत स्वतः अथवा मित्र, एजंट, मुखत्यार, नातेवाईक किंवा इतर कोणाही मार्फत अडथळा निर्माण करु नये, यासाठी वादीने तात्पुरता मनाई हुकुम मिळावा म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**<u>वादीचे थोडक्यात म्हणणे</u>**

२. वादीचे कुटूंबाचा व्यवसाय शेती असुन शेती हेच त्यांचे उपजिविकेचे एकमेव साधन आहे. प्रतिवादी त्यांचे दीर व जाऊ असुन त्यांची शेती वादीचे शेतीचे पुर्वेस आहे. दावा मिळकत आपसी वाटणीपत्रानुसार वादीचे नामे गजानन यांचेकडुन वादीचे हिस्स्यावर मालकी हक्काने आली आहे व वादीचे नावाने महसुल दप्तरी फेरफार होवुन नोंद झालेली आहे. सदर जमिन वादीचे ताब्यात व वहितीत मालकी हक्काने आहे. वादी व प्रतिवादींचे नावाने असलेली शेतजमिन त्यांची वडिलोपार्जित शेतजमिन आहे. वादीचे ताब्यात असलेले शेतजमिनीचे वादी निरंतरपणे वहिती करुन दरवर्षी पिके लावुन उत्पन्न घेत आहे. दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी वादी शेतजमिनीची नांगरणी वखरणी करुन शेतजमिन पेरणी योग्य केली आहे. प्रतिवादींची शेतजमिन वादीचे ताब्यात नसतांना सुध्दा त्यांनी विनाकारण वाद करुन

बेकायदेशीरपणे अतिक्रमण करुन ताबा घेण्याचा प्रयत्न करतात. दिनांक ११/०६/२०१९ रोजी प्रतिवादींनी वादीचे ताब्यातील काही भागात लाकडे रोवुन ताबा घेण्याचा प्रयत्न करित होते. त्यामुळे वादीने त्यांना तुम्ही कसे काय लाकडे रोवता असे म्हटले असता त्यांनी वादीसोबत वाद करुन धमकी दिली. त्यामुळे वादीने पोलीस स्टेशन येथे प्रतिवादीविरुध्द रिपोर्ट दिला. परंतु रिपोर्टवर कोणतीही कारवाई न केल्याने प्रतिवादींची हिम्मत वाढली व ते वादीला शेतजमिनीतुन बेदखल करण्याची धमकी देत आहे. प्रतिवादीने वाद मालमत्तेत ताबा व वहितीपासुन वादीला बेदखल केल्यास वादीचे पैशाने न भरुन निघणारे अपरिमित नुकसान होईल. तसेच वादीचे हक्क संरक्षण करण्याचे हेतुने तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश देण्याची विनंती केली. त्यामुळे, प्रतिवादींना अटकाव करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

## प्रतिवादींचे थोडक्यात म्हणणे

**५.** दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी हजर झाले व त्यांनी *निशाणी क्र.१३* अन्वये अर्जावरील म्हणणे दाखल केले. प्रतिवादींनी अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, ते पती–पत्नी असुन त्यांचे मालकी व प्रत्यक्ष ताब्यात शेतजमिन मौजा सातारा येथील शेत गट क्र.१ क्षेत्रफळ १ हे. ६० आर याची चतुःसिमा पुर्वेस– गट क्र.१८ व २०, पश्चीमेस– गट क्र.३ व ४, उत्तरेस– गट क्र.२ व दक्षीणेस– गावठाण अशी आहे. सदर मालमत्ता त्यांनी आकाश इंगोले यांचेकडुन नोंदणीकृत खरेदीखताद्वारे सन २००९ मध्ये विकत घेतली आहे. तेव्हापासुन ते सदर शेतजमिनीचे कायदेशीर मालक असुन प्रत्यक्ष ताब्यात आहे. प्रतिवादी यांनी सन २०१७ मध्ये मोजणीकरिता भूमि अभिलेख कार्यालयात अर्ज केला होता. त्यानुसार दि.०४/०५/२०१७ रोजी मोजणी करण्यात आली होती व पुन्हा गट क्र.१ ची दि.०४/०६/२०१८ रोजी मोजणी केली होती आणि मोजणी केली. मोजणीमध्ये स्पष्ट

झाले की, गट क्र.३ व ४ च्या सामाईक धारकाच्या ताब्यात गट क्र.१ ची ०.१४ आर क्षेत्रफळाची शेतजमिन आहे. सदर मोजणीचे वेळी वादी, तिचे पती व इतर साक्षीदार हजर होते. त्यानुसार दि.१५/०६/२०१८ रोजी हद्द कायम करण्यात आली. त्यानंतर वादी व तिचे पती यांनी मोजणी व हद्द मान्य नाही म्हणुन पुन्हा हद्द कायम करण्याबाबत मोजणी दि.१४/०५/२०१९ रोजी केली होती. त्या मोजणीमध्ये सुध्दा स्पष्ट झाले की, गट क्र.१ ची शेतजमिन क्षेत्रफळ ०.०९ आर गट क्र.४ चे वहितीत आढळुन आली आहे. त्यानुसार त्याच दिवशी हद्द कायम करण्यात आली आणि वादी हीने लाकडे रोवुन एक पदरी तारेचे कंपाऊंड केलेले होते. म्हणजेच ज्या ठिकाणी वादीच्या शेतजमिनीची हद्द संपली त्या ठिकाणावरुन् त्यांनी लाकडे रोवुन तारेचे कुंपण घातले. त्यानुसार मोजणीप्रमाणे प्रतिवादीचे गट क्र.१ मध्ये वहितीचे क्षेत्र ०.०९ आर प्रतिवादीचे वहिती व ताब्यामध्ये आले. परंतु त्यानंतर वादी व तिचे पती यांनी तारेचे कुंपण रामराव इंगोले यांचे माध्यमातुन काढुन टाकण्यास सुरुवात केली. प्रतिवादीने विचारले असता त्यांनी प्रतिवादीला शिवीगाळ करुन ढकलुन धमकी दिली. त्याबाबत दि.१५/०६/२०१९ रोजी प्रतिवादी क्र.२ हीने रामराव इंगोले यांचे विरुध्द पोलीस स्टेशन आर्णी येथे तक्रार दिली. त्यानुसार अदखलपात्रचा गुन्हा नोंदवला आहे.

६. वादी व तिचे पतीने स्वतः हद्द कायम करणेबाबत मोजणी करुन हद्द मोजणी करुन त्यांचे हद्दीमध्ये येणाऱ्या पुर्व भागेच्या सिमेला म्हणजेच प्रतिवादीचे पश्चीमेला लाकडे रोवुन तारेचे कंपाऊंड घातले व पुन्हा तेच कुंपण गैरकायदेशीररित्या तोडण्याचा प्रयत्न करुन वाद उपस्थीत केला. त्यामुळे वादी स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आली नसल्यामुळे व प्रतिवादीने कोणत्याही प्रकारे अतिक्रमण केले नसल्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह खारिज करण्याची विनंती केली.

## वादींच्या विधीज्ञांचा युक्तीवाद

७. वादीचे विधीज्ञ श्री.आर.आय.मुंढे यांनी असा युक्तिवाद केला की, वादी शेतकरी असुन त्यांचे उपजिविकेचे एकमेव साधन शेती आहे. वाद शेतजमिन वादीला तिच्या पतीच्या हिस्स्यासवर आली असुन वादीचा सदर शेतजमिनीवर ताबा व वहिती आहे. प्रतिवादी यांची शेतजमिन वादीच्या शेतजमिनीच्या लागुन आहे. प्रतिवादीने वादीचे शेतजमिनीवर अतिक्रमण करुन वादीचे ताब्यास अडथळा निर्माण केला. अर्ज मंजूर न केल्यास वादीचे कधीही न भरुन निघणारे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे दाव्याचा निकाल लागेपर्यंत तात्पुरता मनाई हुकूम मंजूर करण्याची विनंती केली.

## प्रतिवादींच्या विधीज्ञांचा युक्तीवाद

८. प्रतिवादीचे विधीज्ञ श्री.ए.डि.चौधरी यांनी असा युक्तिवाद केला की, वादी व प्रतिवादी नातेवाईक असुन प्रतिवादीने वादीचे शेतजमिनीवर अतिक्रमण केले नाही. प्रतिवादीने भूमि अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी केली असुन त्यामुळे इतर धारकाने अतिक्रमण केले असे आढळुन आले. वादी व तिचे पतीने त्यांचे स्वतःचे मालकीचे शेतजमिनीची मोजणी करुन त्यानुसार लाकडे रोवुन तारेचे कुंपण केले होते. त्यामुळे प्रतिवादी यांना मोजणीप्रमाणे प्रतिवादी यांना त्यांची ०.०९ आर परत मिळावी. परंतु वादीने तारेचे कुंपण पुन्हा काढुन टाकणेस सुरुवात केली व प्रतिवादीला शिवीगाळ करुन धमकी दिली. वादी हे स्वच्छ हाताने आले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

## मुद्दे आणि निष्कर्ष

९. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजुंची कथने आणि अभिलेखावरील कागदपत्रे यांचे अवलोकन करुन, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघत असुन त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवत आहे.

| क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | सकृतदर्शनी प्रकरण वादीच्या बाजुने आहे, असे वादी सिध्द करतो काय? | – | **नकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय? | – | **नकारार्थी** |
| ३. | अर्ज नामंजुर केल्यास वादीचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे काय? | – | **नकारार्थी** |
| ४. | काय आदेश? | – | **अर्ज *निशाणी क्र.५* नामंजुर करण्यात येतो** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.१ साठीः–**

**(प्रथमदर्शनी केस)**

**१०.** प्रथमदर्शनी केस कुणाच्या बाजुने आहे हे पाहण्यासाठी, अंतिम न्यायनिर्णयासारखे, अभिलेखावरील पुराव्यांच्या खोलात जाणे अपेक्षित नाही. कारण, सद्यस्थीतीमध्ये या न्यायालयासमोर दोन्ही पक्षांचा कोणताही तोंडी पुरावा नाही. तसेच दोन्ही पक्षांनी दाखल केलेले कागदपत्रांच्या सत्यतेबाबत देखिल कोणताही पुरावा नाही. वादी–प्रतिवादींनी अभिलेखावर जो कागदोपत्री पुरावा दिलेला आहे आणि साक्षीदारांचे शपथपत्र दिलेले आहेत, त्यावरुनच प्रथमदर्शनी केस कुणाच्या बाजुने आहे, हे न्यायालयाने पहाणे अपेक्षित आहे.

**११.** दोन्ही पक्षांच्या कथनाचा विचार केला असता, ही बाब स्पष्ट होते की, प्रतिवादी हे वादीचे दीर व जाऊ असुन त्यांची शेतजमिन वडिलोपार्जित शेतजमिन आहे. तसेच शेतजमिन एकमेकांना लागुन आहे. वादशेतजमिन आपसी वाटणीपत्रानुसार वादीचे

पती यांचे हिस्स्यावर मालकी हक्काने आली आहे. त्यानुसार महसुल दप्तरी वादीच्या नावाने नोंद झाली आहे. वादीने मालकी हक्क दाखविण्याकरिता दस्तऐवज क्र.१ भूमापन क्र.४ चा मौजे सातारा येथील ७/१२ दाखल केला आहे. त्यावरुन असे दिसते की, भूमापन क्र.४ चे एकुण क्षेत्रफळ १.७४ हे.आर वादी यांचे  नावे आहे. तसेच दस्तऐवज क्र.२ वरिल ७/१२ वरुन असे दिसते की, प्रतिवादी यांचे नावे प्रत्येकी ०.८० एकुण १.६० हे.आर. शेतजमिन आहे.

**१२.** वादीच्या कथनानुसार प्रतिवादीने त्यांचे मालकी व ताब्यातील शेतजमिनीवर लाकडे रोवुन ताबा घेण्याचा प्रयत्न केला. वादीने हटकले असता त्याने वादीला वाद करुन धमकी दिली. त्याबाबतचा रिपोर्ट दस्तऐवज क्र.५ दि.१८/०६/२०१९  रोजी वादीने पोलीस स्टेशन येथे दिला. प्रतिवादीचे कथनानुसार त्यांनी त्यांचे ताब्यातील शेतजमिनीची सन २०१७ मध्ये भूमि अभिलेख कार्यालयामार्फत मोजणी केली होती. त्यानंतर पुन्हा दि.०४/०६/२०१८ रोजी मोजणी केली. मोजणीवरुन गट क्र.३ व ४ चे धारकाच्या ताब्यात गट क्र.१ ची ०.१४ आर शेतजमिन असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दि.१५/०६/२०१८ रोजी हद्द कायम करण्यात आली. प्रतिवादीने सदर मोजणीची 'क' प्रत अभिलेखावर दाखल केली. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादीने व तिचे पतीने ज्या ठिकाणी त्यांचे शेतजमिनीची हद्द संपली त्या ठिकाणी तारेचे कुंपण घातले परंतु त्यानंतर त्यांनी ते काढुन टाकण्यास सुरुवात केली. प्रतिवादीने त्यांना विचारले असता वादीने त्यांना ढकलढुकल केले व शिवीगाळ केली. प्रतिवादीने दि.१५/०६/२०१९ रोजी दिलेल्या रिपोर्टची प्रत दाखल केली आहे.

**१३.** वादी व प्रतिवादी यांनी निशाणी क्र.१७ अन्वये संयुक्त पुरसिस द्वारे कोर्ट कमिशनरची नियुक्ती करुन शेतजमिनीची मोजणी करण्याबाबत विनंती केली. त्यानुसार

माझे पुर्वाधिकारी यांनी दि.०४/१२/२०१९ रोजी मोजणीचे आदेश पारित केले. त्यानंतर उपअधिक्षक भूमि अभिलेख यांनी नि.क्र.२० अन्वये मोजणी करुन अहवाल दाखल केला व मोजणीची 'क' प्रत दाखल केली. सदर प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, गट क्र.१ प्रतिवादी यांची असुन त्यामध्ये गट क्र.२ चे धारक उज्वला इंगोले यांच्या ताब्यात ०.०२ हे.आर शेतजमिन आहे. तसेच गट क्र.४ वादी यांच्या ताब्यात ०.१२ हे.आर जमिन आहे. तसेच गट क्र.४ चे खातेदार वादी रेखा यांचे जमिन गट क्र.३ चे धारक रामराव इंगोले यांचे ताब्यात ०.२२ हे.आर आहे. तसेच सदर अहवालावरुन लगतच्या धारकांचे ताब्यात शेतजमिन असल्याबाबत देखील दिसुन येत आहे. त्यामुळे अभिलेखावर दाखल कागदपत्रे व मोजणीचे अहवालावरुन प्रतिवादींनी वादीचे मालकी व ताब्यातील शेतजमिनीवर अतिक्रमण केल्याचा प्रयत्न केला असे स्पष्ट होत नाही. त्यामुळे, वरील चर्चेच्या अनुषंगाने, वादीने प्रथमदर्शनी केस वादींच्या बाजुने आहे, हे सिध्द केले नाही. त्यामुळे, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.२ साठीः-</u>**

**<u>(न्यायाचा समतोल)</u>**

**१४.** मुद्दा क्र.१ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे, प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने आहे, ही बाब सिध्द झालेली नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल हा देखिल वादीच्या बाजुने नाही, ही बाब सिध्द होते. त्यामुळे मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.३ साठीः-</u>**

**<u>(अपरिमीत नुकसान)</u>**

**१५.** वादीने प्रथमदर्शनी केस त्यांचे बाजुने असल्याचे सिध्द केले नाही. न्यायाचा समतोल देखील वादीचे बाजुने नाही. त्यामुळे, मनाई हुकुम नाकारल्यास, वादीचे नुकसान

होऊ शकते, असे दिसत नाही. त्यामुळे मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र.४ साठीः–**

**(काय आदेश)**

**१६.** मुद्दा क्र.१ ते ३ च्या उत्तराच्या अनुषंगाने वादीचा *निशाणी क्र.५* चा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा तात्पुरत्या मनाई हुकुमाचा अर्ज *निशाणी क्र.५* नामंजुर करण्यात येतो

२. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SAPNA MILIND PATIL
Date: 2023.06.30 18:04:29 +0530

दिनांक – ३०/०६/२०२३

**(सपना एम.पाटील)**

सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर,

**आर्णी**